रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

महाराष्ट्र शासन राजपत्र

प्राधिकृत प्रकाशन

गुरुवार, जानेवारी २९, २००९/माघ ९, शके १९३०

भाग चार-अ

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमान्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

वित्त विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ डिसेंबर २००८

अधिसूचना

भारताचे संविधान.

क्रमांक मनासे. १००७/प्र.क्र.-७/०७/सेवा-६.— भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ याच्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ यात आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना ' महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) (सुधारणा) नियम, २००८ ' असे म्हणावे.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ (यात यापुढे ज्याचा निर्देश ' मुख्य नियम ' असा करण्यात आला आहे) च्या नियम-३८ मधील पोटनियम (२) मध्ये सूचनांच्या शीर्षकाखालील,—

[किंमत : रुपये ५.००]

(ए) सूचना क्रमांक (१) व (२) या ऐवजी पुढील सूचना दाखल करण्यात येतील :—

"(१) दिनांक १६ ऑगस्ट १९८१ रोजी किंवा त्यानंतर ज्याने शासकीय सेवेत प्रवेश केला आहे, त्या शासकीय कर्मचाऱ्याने शासकीय सेवेत प्रवेश केल्याच्या तारखेपासून पाच वर्षांच्या कालावधीनंतर, आपल्या सेवापुस्तकात किंवा सेवापटात नोंदलेल्या जन्मतारखेमध्ये फेरबदल करण्यासाठी दिलेल्या अर्जावर विचार केला जाऊ नये.

(२) वरील सूचना क्रमांक (१) च्या अधिनतेने, शासकीय कर्मचाऱ्याने, तो ज्या ठिकाणी जन्माला आला आहे त्या ठिकाणी ठेवण्यात आलेल्या व त्या त्यावेळी जन्मनोंदणीसंबंधात अंमलात असलेल्या नियमांनुसार, ज्या मूळ जन्मनोंदणीवहीत त्याचे नांव व जन्मतारीख नोंदली आहे त्या नोंदवहीतील संबंधित पृष्ठाची साक्षांकित झेरॉक्स प्रत सादर केल्यास, त्यावरून शासकीय कर्मचाऱ्याची खरी जन्मतारीख निश्चित करता येईल व असा पुरावा त्याच्या सेवा अभिलेखात बदल करण्यासाठीचा प्रश्नातीत पुरावा म्हणून विचारात घेतला पाहिजे.

(२ए) अर्जाची छाननी करतेवेळी, पुढील बाबींची खातरजमा करण्यात येईल.—

(एक) उक्त शासकीय कर्मचाऱ्याने शाळेत प्रवेश घेताना, शासकीय सेवेत प्रवेश करताना, अंतर्भूत करावयाच्या जन्मतारखेपेक्षा वेगळी जन्मतारीख नोंदवून फायदा घेतलेला नाही.

(दोन) अशारीतीने फेरबदल केलेली जन्मतारीख, कोणत्याही शाळेत किंवा विद्यापीठात प्रवेश घेण्यासाठी किंवा महाराष्ट्र लाकसेवा आयोगाच्या ज्या परीक्षेला तो बसला होता किंवा शासकीय सेवेत प्रवेश करण्यासाठी ज्या दिवशी तो अशा परीक्षेला प्रथमत: बसला किंवा तो ज्या तारखेस शासकीय सेवेत प्रवेश केला त्यासाठी, त्याला अपात्र ठरविणार नाही.

(२बी) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) (सुधारणा) नियम, २००८ अंमलात येण्याच्या दिनांकास, शासनाकडे शासकीय कर्मचाऱ्याच्या जन्मतारखेच्या संबंधातील नोंदीत फेरफार करण्यासाठी प्रलंबित असलेल्या कोणत्याही अर्जावर, अशा शासकीय कर्माचाऱ्याच्या निवृत्तीच्या दिनांकानंतर कार्यवाही केली जाणार नाही, आणि असा अर्ज निवृत्तीच्या दिनांकास नाकारण्यात आल्याचे समजून आपोआप निकालात काढण्यात येईल. निवृत्त शासकीय कर्मचाऱ्याने असा कोणताही अर्ज केल्यास, तो विचारात घेतला जाणार नाही."

(बी) सूचना क्रमांक (३) मधील " सूचना क्रमांक (१) शिथिल करून, गुणवत्तेनुसार विचारात घ्यावयाचे " हा मजकूर वगळण्यात येईल.

३. सदर शासन अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब साईटवर उपलब्ध करून देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००८१२१९११४३३९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अरविंद पाटील,
शासनाचे उप सचिव.

प्रति,

महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता) गोरेगाव, महाराष्ट्र, मुंबई (५० प्रती)
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई (८० प्रती)
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, नागपूर (६० प्रती)
महालेखापाल-१ (लेखापरीक्षा) महाराष्ट्र, मुंबई (८० प्रती)
महालेखापाल-२ (लेखापरीक्षा) महाराष्ट्र, नागपूर (६० प्रती)
संचालक लेखा व कोषागारे मुंबई (५ प्रती)
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (४० प्रती)
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई (१० प्रती)
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई (५ प्रती)
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई / पुणे / औरंगाबाद / नाशिक / अमरावती.
राज्यपालांचे सचिव.
मुख्य मंत्र्यांचे सचिव.
उप मुख्यमंत्र्यांचे सचिव.
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
* प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई.
* प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय मुंबई.
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभाग,
विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस मार्ग, नवी दिल्ली.
संचालक, विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागाच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख.
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
वित्त विभागातील सर्व कार्यासने, (ग्रंथपाल ५ प्रती),
निवड नस्ती-कार्यासन सेवा-६,

---

* पत्राने

FINANCE DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated 24th December 2008

NOTIFICATION

CONSTITUTION OF INDIA

No. MCS.1007/C. R. 7/07/SER-6.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules further to amend the Maharashtra Civil Services (General Conditions of Services) Rules, 1981, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Civil Services (General Conditions of Services) (Amendment) Rules, 2008.

2. In rule 38 of the Maharashtra Civil Services (General Conditions of Services) Rules, 1981, (hereinafter referred to as "the principal Rules "), in sub-rule (2), under the heading Instruction,—

(*a*) for Instruction No.(1) and (2), the following Instructions shall be substituted, namely :—

"(1) No application for alteration of the entry regarding date of birth as recorded in the service book or service roll of a Government servant, who has entered into the Government service on or after the 16th August 1981, shall be entertained after a period of five years commencing from the date of his entry in Government service.

(2) Subject to Instruction (1) above, the correct date of birth of a Government servant may be determined, if he produces the attested zerox copy of the concerned page of the original birth register where his name and date of birth has been entered as per the rules for the time being in force regarding the registration of birth, and maintained at the place where the Government servant is born, such proof should be considered as an unquestionable proof for change of date of birth in service record.

(2A) At the time of scrutiny of the application, it shall be ensured that,—

(i) no advantage has been gained in school admission, entry into Government service by the said Government servant by representing a date of birth which is different than that which is later sought to be incorporated ;

(ii) the date of birth so altered would not make him ineligible for admission in any school or University or for the Maharashtra Public Service Commission examination in which he had appeared; or for entry into Government service on the date on which he first appeared at such examination or on the date on which he entered in the Government service.

(2B) No application for alteration of entry regarding date of birth of the Government servant pending with the Government on the date of commencement of the Maharashtra Civil Services (General Conditions of Services) (Amendment) Rules, 2008 shall be processed after the date of retirement of such Government servant and such application shall automatically stand disposed of as rejected on the date of retirement. Any such application made by the retired Government servant shall not be entertained." ;

(*b*) in Instruction No. (3), the words, brackets and figure " as are proposed to be entertained on merits in relaxation of instruction No. (1) " shall be deleted.

3. This Notification is available on the web site of Government of Maharashtra i.e. " www.maharashtra.gov.in " and its Computer code number is 20081219114339001.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ARVIND PATIL,
Deputy Secretary to Government.

To,

Accountant General (Accounts and Entitlement) I, Goregaon, Maharashtra, Mumbai. (50 Copies)

Accountant General (Accounts and Entitlement) I, Maharashtra, Mumbai. (80 Copies)

Accountant General (Accounts and Entitlement) II, Maharashtra, Nagpur, (60 Copies)

Accountant General (Audit) I, Maharashtra, Mumbai. (80 Copies)

Accountant General (Audit) II, Maharashtra, Nagpur. (60 Copies)

Director, Accounts and Treasuries, Mumbai (5 Copies)

The Pay and Accounts Officer, Mumbai. (40 Copies)

The Chief Auditor, Local Fund Accounts, New Mumbai (10 Copies)

The Resident Audit Officer, Mumbai (5 Copies)

Deputy Chief Auditor, Local Fund Accounts, Mumbai/Pune/Aurangabad/ Nasik/ Amravati.

The Secretary to Governor,

The Principal Secretary to Chief Minister,

The Secretary to Deputy Chief Minister,

Private Secretaries to all Ministers and Ministers of State

* The Prothonotary and Senior Master, High Court of Judicature, Mumbai,

* The Registrar, High Court of Judicature, Appellate Side, Mumbai,

* The Registrar, Office of the Lokayukta and Upa Lokayukta, Mumbai,

* The Secretary, Maharashtra Public Service Commission, Mumbai,

* The Secretary, Maharashtra Legislature Secretariat, Mumbai,

All Departments of Mantralaya.

Special Commissioner, Maharashtra Sadan, Copernicus Marg, New Delhi.

Director, Directorate of Insurance, Maharashtra State, Mumbai.

All Heads of Departments and Heads of Offices under the various Departments of the Mantralaya.

All Divisional Commissioners.

The Chief Executive Officer of all Zilla Parishadas.

All Desks in Finance Department (5 Copies to Librarian)

The Select File, SER-6.

---

*By letter.